सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आ. मनोज कायंदे यांचा सत्कार
>> पान 2

घटनेचा मास्टरमाईंड वाल्मीक कराडच; आमदार सुरेश धस यांचा दावा
>> पान 3

विकास कामाच्या भूमिपूजनावरून आरोप प्रत्यारोपाच्या फैरी
>> पान 4

**सुविचार**

भक्तीच्या पवित्रतेने जीवनात शांती आणि प्रामाणिकता प्राप्त होतो.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 200 ■ रविवार, दि. 02 मार्च 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




'ॲनिमल' मध्ये बॉबी देओल का होता मुकबधीर?

आतील पान

# खंडणी ॲट्रॉसिटी अन् संतोष देशमुख हत्येची साखळी एकच

## आरोपपत्रातून सीआयडीचा मोठा उल्लेख

**दैनिक आपला विदर्भ**



**बीड/प्रतिनिधी : संतोष देशमुख हत्या प्रकरणात १४०० पानी आरोपपत्र आता एका वृत्तवाहिनीच्या हाती आले असून या तपासात महत्वाचे गौप्यस्फोट झाले असून या हत्येचा सुत्रधार वाल्मिक कराडच असल्याचं आता स्पष्ट झालंय. या आरोपपत्रातील होणाऱ्या उल्लेखांमधून मोठे उलगडे झाले असून खंडणी, ॲट्रॉसिटी आणि संतोष देशमुख यांच्या हत्येची साखळी एकच असल्याचा मोठा उलगडा आता खुद्द सीआयडीने केल्याने सारेच चित्र स्पष्ट झाले आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात खंडणी, ॲट्रॉसिटी आणि संतोष देशमुख हत्या या तिन्ही घटनांचा आरोपपत्रात एकत्रित उल्लेख करण्यात आला आहे.**

या संपूर्ण प्रकरणात मोठे मुद्दे समोर आले आहेत. याआधी या तिन्ही घटनांचा वेगवेगळ्या तपास केला जात होता. खंडणी ट्रॉसिटी आणि संतोष देशमुख हत्या हे तिन्ही प्रकरण एकत्र करून त्याचा तपास केला जातोय .आरोप पत्रातून मोठे धागेदोरे समोर आले आहेत. हे तिन्ही प्रकरणं आधी वेगळे होते त्यामुळे या तिन्ही गुन्ह्यांचे वेगवेगळे आरोपपत्र दाखल व्हायला हवे होते .मात्र , सीआयडीच्या तपासात या तिन्ही घटना एकमेकांना पूरक असल्याचं लक्षात आल्यानंतर या तीनही प्रकरणांचा एकत्रित उल्लेख करण्यात आलाय.

मकोका अंतर्गत गुन्हा दाखल झाल्यानंतर ९० दिवसात आरोपपत्र दाखल करण्याची मुभा तपास एजन्सीला असते . मात्र संतोष देशमुख हत्या प्रकरणात केवळ ८० दिवसात चार्जशीट दाखल झाली .या संपूर्ण प्रकरणात पहिल्यांदा दाखल झालेला खंडणीचा गुन्हा हा ट्रॉसिटीशी सुसंगत होता .ट्रॉसिटी चा मारहाणेशी आणि मारहाणीचा हत्येशी अशी गुन्ह्यांच्या साखळीचा मोठा उलगडा आरोप पत्रात झालाय .हे तीन गुन्हे एकमेकांपासून वेगळे असल्यास ते तर तीन चार्जशीट दाखल झाले असत्या मात्र सीआयडीने या तीनही प्रकरणांचा एकत्रित उल्लेख केलंय .

**काय होता गुन्ह्यांचा घटनाक्रम?**

२९ नोव्हेंबरला सुदर्शनच्या फोनवरून वाल्मिक कराडने खंडणी मागितल्याचे समोर आले. त्यानंतर खंडणीचा गुन्हा दाखल झाला. ६ डिसेंबरला संतोष देशमुख सुदर्शन घुले , प्रतीक घुले आणि सांगळेशी वाद झाला .त्यानंतर संतोष देशमुख यांना जबर मारहाण झाली .मारहाणीच्या प्रकरणात ट्रॉसिटी दाखल करण्यात आली होती .

९ डिसेंबरला संतोष देशमुख यांची हत्या झाली .हत्येचा गुन्हा वेगळा होता .या प्रकरणातील ५ गोपनीय साक्षीदारांच्या जबाबानंतर वाल्मिक कराडविरुद्ध पुरावे मिळाले . खंडणी दिली नाही म्हणूनच संतोष देशमुख यांना मारहाण झाली व त्यांची हत्या करण्यात आली हे स्पष्टपणे उघड झाल्याने या तीनही प्रकरणांचा एकत्रित उल्लेख आरोप पत्रात करण्यात आल्याने सारेच चित्र स्पष्ट झाले आहे .

या आरोपपत्रामधून वाल्मीक कराड हाच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाचा सुत्रधार असल्याचं पोलिसांनी दाखल केलेल्या दोषारोपपत्रातून सिद्ध झालं आहे. त्यामुळे वाल्मीक कराड भोवती आता कारवाईचा फास पूर्णतः आवळला गेला आहे.

## एकनाथ शिंदेंच्या निर्णयाला देवेंद्र फडणवीसांचा पुन्हा ब्रेक!



**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे असताना त्यांच्या कार्यकाळात घेतलेल्या आणखी एका निर्णयाला फडणवीस सरकारकडून पुन्हा एकदा ब्रेक लावण्यात आला आहे. शिंदे सरकारच्या काळातील आरोग्य विभागाच्या ३ हजार २०० कोटी रुपयांच्या कामांना स्थगिती देण्यात आल्याची माहिती पुढे आली आहे. कामाचा कोणताही अनुभव नसताना कंपनीला यांत्रिकी साफसफाईचे कंत्राट दिल्याचा ठपका ठेवत तत्कालीन आरोग्य मंत्री तानाजी सावंतांवर आरोप करण्यात आले आहे.

दरम्यान, या निर्णयामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिंदे सरकारच्या अनियमिततेबद्दल कारवाई करण्यास सुरुवात केली असून शिंदे सरकारच्या अनेक निर्णयांना स्थगिती दिली आहे. तर काही निर्णय रद्द करण्यात येणार असल्याचीही माहिती पुढे आली आहे.

शिंदे सरकारच्या कार्यकाळात तानाजी सावंत हे आरोग्य मंत्री होते. त्यांच्या काळात अधिकाऱ्यांच्या बदल्या, ॲम्ब्युलन्स खरेदीसह हजारो कोटी रुपयांचे घोटाळे झाले होते. आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील सर्व शासकीय रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रे येथे बाह्य यंत्रणेद्वारे सफाई करण्याचा करार करण्यात आला होता. यासाठी वार्षिक ६३८ कोटी रुपये तर ३ वर्षांसाठी एकूण ३, हजार १९० कोटी रुपयांचा ठेका पुण्यातील एका खासगी कंपनीला ३० ऑगस्ट २०२४ रोजी देण्यात आला होता. दरम्यान, आरोग्य विभागातील एकनाथ शिंदेंच्या याच निर्णयाला देवेंद्र फडणवीसांनी ब्रेक लगावला असल्याचे पहायला मिळाले आहे.

## सोमवारपर्यंत धनंजय मुंडेंचा राजीनामा घेतला नाही तर आम्ही पेटून उठू; अंजली दमानियांचा जाहीर इशारा

**मुंबई/प्रतिनिधी :** बीड येथील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मिक कराड हाच सूत्रधार असल्याचे पोलिसांनी दाखल केलेला आरोप पत्रातून समोर आले आहे. ट्रॉसिटी, खंडणी आणि हत्या या तिन्ही घटनांचा एकत्रित उल्लेख आरोपपत्रातून करण्यात आला आहे. यानंतर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी जोरदार हल्लाबोल केलाय. धनंजय मुंडे यांच्यासारखी माणसे राजकारणात असली तर अनेक वाल्मिक कराड तयार होतील, असे त्यांनी म्हटले आहे. तर सोमवारपर्यंत धनंजय मुंडेंचा राजीनामा घेतला नाही तर आम्ही पेटून उठू, असा जाहीर इशारा देखील त्यांनी दिला आहे.

अंजली दमानिया पत्रकार परिषदेत म्हणाल्या की, आज चार्जशीट दाखल झालेली आहे. धनंजय मुंडे यांना कराडला वाचवायचे होते, यासाठी वेगवेगळे गुन्हे दाखल केले.

६ तारखेला जी मारामारी झाली, त्यानंतर सुदर्शन घुले आणि वाल्मिक कराड यांचे बोलणे झाले. धनंजय मुंडे यांच्यासारखी माणसे राजकारणात असली तर अनेक वाल्मिक कराड तयार होतील. १० वर्ष या सर्वांचे सिंडीकेट होते, असा आरोप त्यांनी केला.

# जलजीवन मिशन योजनेचा भ्रष्टाचार विधानसभेत पोहोचण्याची शक्यता



दैनिक आपला विदर्भ

मुख्य संपादक : देविदास खनपटे 9767233034

जनतेची दिशाभूल करून शासकीय निधीवर अधिकारी, ठेकेदाराचा डल्ला?

दोन वर्षानंतरही जल जीवन मिशनचे काम अपूर्ण; अधिकारी म्हणतात जाग्याचा वाद मग अर्धवट काम झाले कसे

भाग १६

संबंधित पाणीपुरवठा अधिकाऱ्याकडून दिशाभूल करणारी माहिती

दोन वर्षानंतरही कऱ्हाडवाडी पाण्याचा प्रश्न कायम; गावकरी त्रस्त, अधिकारी व कंत्राटदार मात्र मस्त

जल जीवन मिशनचे काम अर्धवट : नागरिकांची पाण्यासाठी भटकंती कायम

भाग ०५

मेहकर : तालुक्यातील कऱ्हाळवाडी येथे २०२३ मध्ये तब्बल ९५ लाख ४३ हजार रुपये खर्च करून जल जीवन मिशन कामास ३१ जानेवारी २०२४ रोजी प्रारंभ करण्यात आला.मात्र, वर्षाच्या वर कालावधी होत असतानाही सदर पाईपलाईन पूर्ण झाली नाही. काम अर्धवट असल्याने कराळवाडी येथील नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली आहे.उन्हाळ्याच्या दिवसात पाण्यासाठी जीवाची लाहीलाही होणार असून अधिकारी व ठेकेदार यांनी जनतेची दिशाभूल करून शासकीय निधीवर डल्ला मारण्याचे काम केले आहे, असा आरोप ग्रामस्थ करीत आहेत.याकडे वरिष्ठांनी लक्ष देऊन संबंधित कामाची चौकशी करत तत्काळ काम पूर्ण करावे अशी मागणी कऱ्हाळवाडी येथील नागरिकांकडून होत आहे.

देविदास खनपटे
मुख्य संपादक

तालुक्यातील कऱ्हाळवाडी येथे जल जीवन मिशन अंतर्गत विहीर खोदणे, पंपगृह, पंपिंग मशीन, मुख्य जलवाहिनी, पाण्याची टाकी, वितरण व्यवस्था आदी काम करण्यासाठी ९५ लाख ४३ हजार रुपयांचा निधी खर्च करून कामास प्रारंभ करण्यात आला होता. सदर कामाचा कालावधी हा बारा महिन्याचा असताना या कामाला बारा महिन्याच्यावर होत असतानाही अद्याप काम पूर्णत्वास गेले नाही. अधिकारी हे जागेचा वाद दाखवून काम बंद असल्याचे सांगित आहेत.तर, डोणगाव येथील ग्राम विकास अधिकारी हे जागेचा व विहिरीच्या कोणत्याही प्रकारचा वाद नाही असे सांगत आहेत. जलवाहिनी झाली नाही त्यामुळे गावात पाणी आलं नाही अशी माहिती ग्रामविकास अधिकाऱ्यांनी दिली आहे. तर, जलजीवन विषयांचे वरिष्ठ अधिकारी हे जागेचा वाद दाखवून शासनाच्या कोट्यावधी रुपयावर डल्ला मारत असल्याचा प्रकार समोर येत आहे.अधिकारी व ठेकेदार यांच्या मिली भगत वृत्तीमुळे मात्र कऱ्हाळवाडी ग्रामस्थांवर पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली आहे. आता उन्हाळा लागला असल्याने पाण्याची दाहकता आणखीच वाढणार आहे. त्यामुळे सदर जलवाहिनीचे काम सुरू तत्काळ पूर्ण करून पाणीपुरवठा करावा, अशी मागणी कराळवाडी येथील ग्रामस्थांकडून होत आहे.

जागेचा कोणताही वाद नाही : ग्रामविकास अधिकारी


कऱ्हाळवाडी येथे जल जीवन मिशन अंतर्गत करण्यात येणाऱ्या जलवाहिनी विहिरीचे संदर्भात जागेचा कोणताही वाद नाही. पाण्याची वितरण व्यवस्था झाली नाही. एका विहिरीचे खोदकाम करण्यात आले आहे मात्र ती वीर कोरडी केली बाजूच्या शेतकऱ्याच्या विहिरीचे दानपत्र करून दिले आहे. विहीर. आणि पाण्याची टाकी अर्धवट उभी आहे. जलवाहिनी झाली नाही त्यामुळे पाणीपुरवठा झाले नाही. जागेचा कोणताही वाद नाही जलवाहिनी सुरू न झाल्यामुळे ग्रामस्थांना पाणी मिळत नाही.

–दीपक तांबारे,
ग्रामविकास अधिकारी,डोणगाव.

20 Feb 2025 - Page 3 | www.aapalavidarbh.com
Powered by softisky | 9764331134

**मेहकर : ग्रामीण भागातील नागरिकांची पाण्याची समस्या दूर व्हावी, त्यांना शुद्ध व मुबलक पाणीपुरवठा मिळावा, वर्षानुवर्षांपासून पाणी समोर टंचाईच्या संकटातून त्यांची मुक्तता व्हावी, यासाठी शासनाने जल जीवन मिशन अंतर्गत योजनेअंतर्गत प्रत्येक गावात कोट्यावधी रुपयाचे कामे करण्यात येत आहेत. मात्र, मेहकर लोणार मतदार संघातील तब्बल दीडशेच्यावर मंजूर कामे अर्धवट असल्याने व या कामांमध्ये प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे आरोप होत असताना शासनाचा कोट्यवधी रुपयाचा निधी हा अधिकारी व ठेकेदार मिळून हडप करीत असल्याचे चित्र मतदार संघात चर्चेला उधान आहे.या संदर्भात आता विधान सभा अधिवेशनात प्रश्न उपस्थित होऊन भ्रष्ट अधिकारी व ठेकेदाराची पोलखोल होण्याची चर्चा मतदारसंघात आहे.**

## ■ कोट्यवधी रुपयांच्या निधीचा संबंधितांनी संगनमताने लावला चुना
## ■ आमदार सिद्धार्थ खरात अधिवेशनात जनतेचा जिव्हाळ्याचा प्रश्न मांडणार?



मेहकर लोणार मतदार संघातील मेहकर तालुक्यात ९२ गावांमध्ये जलजीवन मिशन योजनेअंतर्गत काम करण्यात येत आहे. तर लोणार तालुक्यात जवळपास ६५ गावांमध्ये जलजीवन मिशन अंतर्गत काम करण्यात येत आहे. सदर कामावर कोटयवधी रुपयाचा निधी शासन खर्च करीत आहे. मात्र, करण्यात येणाऱ्या कामापैकी एकही काम पूर्णत्वास गेले नसल्याने शासनाचा कोट्यवधी रुपयाचा निधी हा केवळ अधिकारी व ठेकेदार यांच्यासाठीच खर्च करण्यात आला असल्याचे चित्र मतदार संघात दिसून येत आहे. जल जीवन मिशन योजनेअंतर्गत करण्यात येणाऱ्या बहुतांश कामात प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे. अनेक कामे हे निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहेत. काही ठिकाणी काम पूर्ण नसतानाही देयक काढून शासनाच्या निधीला चुना लावण्याचे काम करण्यात आले आहे. तर, काही ठिकाणी पाण्याचा सोर्स न पाहता केवळ ठेकेदाराचे पोट भरण्यासाठी विहिरीचे खोदकाम करण्यात आले आहे. अशा अनेक प्रकारचा भ्रष्टाचार हा जलजीवन मिशन योजनेत झाला असून याबाबत गावागावातून प्रचंड तक्रारी झालेल्या आहेत. नागरिकांनी उपोषणे, आंदोलन केली आहेत. मात्र, भ्रष्ट अधिकारी व ठेकेदार यांनी कामाला प्राधान्य न देता केवळ निधी हडप करण्याला प्राधान्य दिले असल्याचा आरोप जनता करीत आहे. यासंदर्भात अनेक पदाधिकाऱ्यांनी तक्रारी केल्या आहेत. त्याचबरोबर विद्यमान आमदार सिद्धार्थ खरात यांनीही जिल्हाधिकारी तथा जलसंपदा मंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडे तक्रार करून मेहकर लोणार तालुक्यातील जलजीवन मिशन अंतर्गत झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याची मागणी केली आहे. आता विधानसभेचे अधिवेशन होत असून या अधिवेशनातही मेहकर लोणार मतदार संघातील जलजिवन मिशन अंतर्गत झालेल्या भ्रष्टाचाराच्या कामाचा प्रश्न उपस्थित आमदार सिद्धार्थ खरात करणार असल्याची चर्चा मतदारसंघात होत आहे.





देविदास खनपटे
मुख्य संपादक

### भ्रष्ट अधिकारी व ठेकेदाराचे पितळ उघडे पडण्याची शक्यता

मेहकर लोणार मतदार संघात तब्बर दीडशेच्या वर गावात जलजीवन मिशन अंतर्गत अंतर्गत पाणीपुरवठा योजनेचे काम करण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत विहीर खोदणे, पंप बसविणे, पंपगृह उभारणे, पाण्याची टाकी उभी करणे, पाण्याची वितरण व्यवस्था करणे आदी कामे करण्याचे नमूद आहे.मात्र, बहुतांश कामांमध्ये नियमाला बगल देत केवळ निधी हडप करण्याचे काम करण्यात आले आहे. सदर कामात प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार करून शासकीय निधीला चुन लावण्याचे काम करण्यात आल्याने व आता विधानसभेत जलजीवन मिशन अंतर्गत झालेल्या कामाचा प्रश्न्न उपस्थित होणार असल्याची चर्चा होत असल्याने भ्रष्ट अधिकारी व ठेकेदाराचे मात्र, पितळ उघडे पडण्याची शक्यता आहे.

## भाकीत उष्णतेच्या लाटेचे!

यावर्षी देशभर कडाक्याची थंडी पडेल अशी शक्यता असताना म्हणावी तशी थंडी पडली नाही. भारताच्या उत्तर भागात डिसेंबर आणि जानेवारी या दोन महिन्यात कडाक्याची थंडी पडली. जानेवारीमध्ये तर सर्व शहरांचे तापमान नीचांकी स्तरावर पोहचले मात्र महाराष्ट्रात कडाक्याची थंडी अभावानेच पाहायला मिळाली. जानेवारी महिन्यात काही ठिकाणी थंडी पडली मात्र फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीलाच थंडी गायब झाली आणि उष्णता वाढली. १९०१ नोंदीनुसार सरासरीपेक्षा अधिक किमान तापमानात यंदाचा फेब्रुवारी महिना प्रथम क्रमांकावर आहे. फेब्रुवारी महिन्यात देशात १५.०२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. यातच फेब्रुवारी महिन्याचे सरासरी कमाल तापमान २९.०७ देखील दुसऱ्या सर्वोच्च पातळीवर होते. सध्या तर अतिशय विचित्र प्रकारचे हवामान अनुभवयास मिळत आहे. सकाळी गार वाऱ्यांसह कडाक्याची थंडी असते तर दुपारी कमालीचे गरम होते. काही शहरांचे सकाळचे तापमान १० अंश सेल्सिअसपेक्षा कमी असते तर दुपारचे तापमान ३० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक असते. राज्यातील सर्वच शहरात जवळपास हेच तापमान आहे. सकाळी हुडहुडी भरणारी थंडी तर दुपारी घामाच्या धारा. वातावरणातील या बदलाने अनेकांचे आरोग्य बिघडले आहे. वातावरणातील या बदलाने थंडी, खोकला आणि सर्दीच्या रुग्णांची संख्या वाढली आहे. लहान मुलांमध्ये तर थंडी तापाची साथच आली आहे. आता आपण मार्चच्या सुरुवातीस असून दिवसेंदिवस तापमानात वाढ होऊ शकते. हवामान खात्याने तर तसा अंदाजच वर्तवताना सांगितले आहे की आगामी काळात उष्णतेच्या प्रमाणात वाढ होणार आहे. याशिवाय तापमानातील चढ उतार कायम राहणार आहे. इतकेच नाही तर अधूनमधून वाहणाऱ्या उष्णतेतही चढउतार होऊ शकेल. हवामान खात्याने वर्तवलेली ही शक्यता चिंताजनक आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते सध्या सौम्य ला निना स्थिती असून लवकरच अल निनोचा पॅटर्न तयार होणार आहे. तज्ज्ञांच्या मते भारतात यावर्षी मागील वर्षापेक्षा अधिक उष्णतेची लाटा येऊ शकतात. मार्च ते मे महिन्यात या उष्णतेच्या लाटेचा सर्वाधिक फटका बसू शकतो. मार्च ते मे महिन्यात महाराष्ट्रासह देशातील काही राज्यात कमाल आणि किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. या काळात उष्णतेच्या लाटेचे प्रमाणही जास्त राहू शकते असा इशाराही भारतीय हवामान विभागाने दिला आहे. जुलै ते सप्टेंबर या काळात देशात अल निनोचा प्रभाव दिसून येईल. असेही हवामान खात्याने सांगीतले आहे मात्र उष्णतेच्या लाटेच्या शक्यतेने सर्वांची चिंता वाढवली आहे. मागील वर्षीही उष्णता मोठया प्रमाणात वाढली होती मात्र यावर्षी उष्णतेच्या लाटेचे प्रमाण अधिक असल्याने चिंता अधिक वाढली आहे. मागील वर्षी पुरेसा पाऊस न झाल्याने राज्यात पाण्याचे दुर्भिक्ष जाणवू लागले आहे. राज्यातील पाणी साठा कमी होत असताना तीव्र उन्हाळ्यामुळे बाष्पीभवनाचा वेग वाढण्याची शक्यता आहे. उन्हाळ्यात जमिनीचा ओलावा कायम राखून पिके जागवण्यासाठी धरणांच्या पाण्याचे नियोजन सरकारी पातळीवर वेळीच करणे गरजेचे आहे. दिवसा आणि रात्रीचे तापमान सरासरीपेक्षा अधिक राहणार असल्याने विजेचा वापर अधिक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्यात विजेचा तुटवडा निर्माण होऊ शकतो. परीक्षांचे दिवस असल्याने विद्यार्थ्यांनाही काळजी घ्यावी लागणार आहे. अल निनोच्या प्रभावाने जगभर वातावरणात बदल होत आहे. जगात एकाच वेळी वेगवेगळे हवामान पहावयास मिळत आहे. जगात कुठे उष्णतेची लाट अनुभवयास मिळते तर कुठे प्रचंड पाऊस पाहायला मिळतो तर कुठे कडाक्याची थंडी अनुभवयास मिळत आहे. अल निनोचा प्रभाव भारतासह जगातील सर्वच देशांवर पडत असल्याने केवळ भारताचीच नव्हे तर संपूर्ण जगाची चिंता वाढली आहे.

# सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आ. मनोज कायंदे यांचा सत्कार

## युवा वर्गासाठी मतदार संघातील प्रत्येक गावात सार्वजनिक वाचनालय, व्यायामशाळा सुरु करणार : आमदार मनोज कायंदे

दैनिक आपला विदर्भ

■ अशोक मुंडे







**महारचिकना :** लोणार तालुक्यातील खळेगाव येथे दिनांक २८ फेब्रुवारी रोजी सिंदखेडराजा विधानसभा विधान सभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार मनोज कायंदे यांचा ग्रामपंचायत खळेगाव चे सरपंच मधुकर सानप उपसरपंच व सर्व सदस्य, गावकरी, युवा वर्ग यांच्याकडुन सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक करताना सरपंच मधुकर सानप यांनी गावातील सर्वच समस्या प्रस्तावित कामे ही आमदार महोदयांना सांगितल्या सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघात जे जातीच पातीच राजकारण खेळल्या जातय ते आपल्याला संपवून मनोजभाऊ यांना पुढच्या पंचविस वर्षे आमदार म्हणून पाहायच आहे असे मनोगत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस गिरीधर ठाकरे यांनी व्यक्त केले.

यापुढील सर्व निवडणुका मनोजभाऊच्या नेतृत्वात लढायच्या असुन युवा वर्गाने मनोज भाऊ यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाचे काम करावे असे मत प्रा.अरविदं चव्हाण यांनी व्यक्त केले यावेळी संतोष खांडेभराड,माजी आमदार तोतारामजी कायंदे यांचे भाषण झाली.

सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघात आपण साडेतीन लाख लोकांचे प्रतिनिधी आहोत त्यामुळे मतदार संघात सर्व समावेशक विकास करणार आहोत खळेगाव येथील सर्व एकोनाविस प्रश्र्न मार्गी लावु तसेच मतदार संघातील प्रत्येक गावाची ब्ल्युप्रिंट काढुन प्रत्येक गावात शेतरस्ते पाण्याची व्यवस्था, युवकांसाठी प्रतेक गावात वाचनालय, व्यायामशाळा उभारणार असल्याचे मत नवनिर्वाचित आमदार मनोज कायंदे यांनी खळेगाव सत्कार सोहळ्याच्या कार्यक्रमात बोलताना केले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे जिल्हा अध्यक्ष ॲड.नाझेर काझी,माजी आमदार तोतारामजी कायंदे,प्रभाकर ताठे जिल्हा उपाध्यक्ष भाजपा माजी नगराध्यक्षा देऊळगाव राजा संतोष खांडेभराड, गिरीधर ठाकरे प्रदेश सरचिटणीस राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ,माजी जिल्हा परिषद सदस्य भगवानराव मुंढे , प्रा.अरविंद चव्हाण सर,देवानंद सानप जिल्हा उपाध्यक्ष युवा मोर्चा भाजपा,जुनेद अली,शंकर उगलमुगले,नितीन कांयदे प्रदेश सरचिटणीस राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, विठोबा मुंढे तालुका अध्यक्ष भाजपा देऊळगाव राजा पाटीलबुवा आंधळे,माजी सभापती सुनिल केंद्रे, इरफान अली, देविदास ठाकरेसह बरीच महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते यावेळी सुत्रसंचालन पत्रकार नागेश कांगणे यांनी केले तर संजय नंदाजी सानप यांनी केले.

# शिरपूर येथील पदवीधर तरुणाने फुलावली टरबूज शेती

## कमी खर्चा मध्ये जास्त उत्पन्न वाढीचा दिला शेतकऱ्यांना कान मंत्र

दैनिक आपला विदर्भ

■ उमेश बोराटे

**शिरपूर:** परिसरात व तालुक्यात प्रामुख्याने तूर, सोयाबीन,हरबरा तसेच भाजीपाला पिके घेतली जातात. मात्र, अलीकडे या पिकाची शेती बिनभरवशाची झाली आहे. यातच उत्पन्न वाढविण्यासाठी शिरपूर येथील युवा शेतकरी गणेश काळे यानी नवा पर्याय निवडला आहे. त्याने एका एकरांत टरबुजाचे अधिक व विक्रमी उत्पादन चा धडा गिरवाच ठरवलं आहे सर्व प्रथम त्यांनी मल्चिंग अंथरून एक एकर क्षेत्रात लागवड केली. पाण्याचे व फवारणीचे योग्य नियोजन करीत बहारदार पीक घेतले. एकरात टरबूज लागवड हि जानेवारीला केली असून,येत्या १५ दिवसात तोडे येतील . टरबुजाची लागवड करण्याकरिता ७ ते ८ हजार रोपट्यांची गरज भासते. याकरिता त्यांनी बाहेरून रोपे खरेदी न करता स्वतः शेतामध्ये रोपे तयार केली. यामुळे त्यांचे रोपे विकत घेण्याचा खर्च वाचला.आणि त्यांनी खताचे आणि विद्राव्य खताचे व पाण्याचे आणि फवारणी चे नियोजन योग्य रित्या जमावले आहे त्यांच्या शेतात होत असलेले टरबूज ते हैद्राबाद मार्केट येथे विक्रीसाठी नेणार आहेत



गणेश काळे यांना कृषी क्षेत्रातील अग्रॅगन्य कंपन्यान मध्ये कामाचा अनुभव आहे ते कंपनी च्या कामा निमित्त वेगवेगळ्या परिसरात कार्यरत होते. तेथील शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन शेती बदल माहिती देत असत व तेथील शेती बघून आपल्याही आपल्या शेतीत असे उत्पन्न घ्याचे आहे हे ठरवले व त्यांनी उत्पादन काढायला सुरुवात केली असे गणेश काळे यांनी सांगितले. प्रथम टरबूज शेती करण्याकरिता माहिती जाणून घेत टरबुजाची शेती फुलविली. या कामात त्यांना त्याच्या कुटूंबातील सदस्य हे मदत करतात. गणेश काळे यांचे शिक्षण बीएस सी (कृषी) मराठवाडा कृषी विद्यापीठ येथून झाले आहे

## ‘ॲनिमल’ मध्ये बॉबी देओल का होता मुकबधीर?

**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्यावर्षी आलेल्या ‘ॲनिमल’ या चित्रपटानं प्रेक्षकांना चांगलंच खिळवून ठेवलं होतं. रणबीर कपूर, रश्मिका मंदाना आणि बॉबी देओल यांच्या दमदार अभिनयानं हा सिनेमा भलताच गाजला. विशेष म्हणजे या चित्रपटात बॉबी देओलने साकारलेल्या खलनायकाच्या रोल सर्वांनाच थक्क केलं. या चित्रपटात तो ना बोलू शकत होता ना ऐकू! मात्र बॉबी देओलला असे पात्र का देण्यात आले असेल याचा विचार तुम्ही कधी केला आहे का. आता चित्रपटाचे दिग्दर्शक संदीप रेड्डी वांगा यांनी यामागचं गूढ उलगडलं आहे.

एका मुलाखतीत बोलताना संदीप म्हणाले की, असा खलनायक दाखवण्यामागे एक वेगळाच विचार होता. ‘एनिमल’मध्ये बॉबीचा एन्ट्री चित्रपटाच्या दुसऱ्या भागात होती. पहिल्या भागात रणबीरचा भयानक अंदाज आणि अनिल कपूर यांची वडीलांची भूमिका पाहायला मिळाली. चित्रपटात भावनिक आणि कौटुंबिक नाट्य दाखवलं आहे. त्यामुळेच बॉबीच्या भूमिकेत कमीत कमी संवाद असावेत असा निर्णय त्यांनी घेतला.

# बुलढाणा कृषी विज्ञान केंद्र येथे कार्यशाळा संपन्न; तज्ज्ञाद्वारे मार्गदर्शन

दैनिक आपला विदर्भ





**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा कृषी विज्ञान केंद्र येथे दि. २७ फेब्रुवारी रोजी आरोग्य आणि पोषण सुरक्षेसाठी वनस्पती अनुवंशिक संसाधनांचे संरक्षण या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आणि जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत विषय तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना विविध विषयावर मार्गदर्शन केले.

राष्ट्रीय वनस्पती अनुवंशिक संसाधन केंद्र नवी दिल्ली आणि कृषी विज्ञान केंद्र बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी डॉ. ज्ञानेन्द्र प्रताप सिंग, संचालक, भा.कृ. अप.- राष्ट्रीय वनस्पती अनुवंशिक संसाधन केंद्र, नवी दिल्ली, डॉ. धनराज उंदीरवाडे, संचालक विस्तार शिक्षण, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, डॉ. एस. के. कौशिक, प्रमुख शास्त्रज्ञ तथा नोडल अधिकारी (एस. सी. एस.पी.),डॉ. कविता गुप्ता, डॉ. सुशील पांडेय, प्रमुख शास्त्रज्ञ, राष्ट्रीय वनस्पती अनुवंशिक संसाधन केंद्र, नवी दिल्ली, डॉ. सुनील गोमाशे, वरिष्ठ शास्त्रज्ञ, राष्ट्रीय वनस्पती अनुवंशिक संसाधन केंद्र अकोला तसेच डॉ. प्रमोद वाकळे, सहयोगी अधिष्ठाता, भाऊसाहेब फुंडकर शासकीय कृषि महाविद्यालय, बुलढाणा, डॉ. सतीश जाधव, प्राचार्य, कृषी तंत्र विद्यालय, बुलढाणा आदी मान्यवर उपस्थित होते.

राष्ट्रीय वनस्पती अनुवंशिक संसाधन केंद्राचे संचालक डॉ. ज्ञानेन्द्र प्रताप सिंग यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, आपल्याकडे असलेल्या पारंपरिक बियाण्यांचे जतन करून पूर्वजांनी ठेवलेला बियाणे वारसा जतन करावा, असे आवाहन केले. असे केल्यास आपण अन्नधान्याच्या बाबतीत प्रगती साधू शकतो तसेच आपल्याकडे उपलब्ध असलेल्या पारंपारिक बियाण्यांचा वापर करून नाविन्यपूर्ण व दर्जे दार वाणांची निर्मिती आपल्याला करता येऊ शकते असे सांगितले. यावेळी आपण सर्व सहभागी शेतकरी पारंपारिक बियाण्यांचे जतन कराल व पारंपारिक बियाणे जतनाचा संदेश इतर शेतकर्यांना द्याल अशी अपेक्षा व्यक्त केली.

डॉ. धनराज उंदीरवाडे यांनी बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या विकासासाठी हा एक चांगला उपक्रम आहे असे सांगून डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला हे संशोधनामध्ये अग्रेसर असून मोठ्या प्रमाणावर नवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून देत आहे. त्याचा वापर करून आपली प्रगती साधावी आणि आपले उत्पन्न वाढवून अर्थकारण बळकट करावे असे आवाहन केले. बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कृषी विज्ञान केंद्र बुलढाणा या कार्यालयामध्ये सतत संपर्क ठेवून येथे उपलब्ध असलेल्या विषय तज्ञांकडून मार्गदर्शन घ्यावे. शेती करत असताना शेतीसोबत विविध जोडधंद्याचा समावेश करावा आणि केंद्राचे सतत मार्गदर्शन घ्यावे. जेणेकरून आपल्या जीवनमानामध्ये चांगला बदल येईल अशी अपेक्षा व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अमोल झापे, वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, बुलढाणा यांनी केले. या कार्यक्रमाच्या आयोजनाच्या मागची भूमिका स्पष्ट करत असताना पारंपारिक बियाणे लुप्त होत आहे आणि त्याचे संवर्धन करणे गरजेचे आहे. एवढ्या मर्यादित दृष्टिकोनातून पाहून चालणार नाही. संवर्धन, लागवड, आहारात आणणे आणि विक्री अशा चतुः सूत्री कार्यक्रमाची गरज आहे आणि हे करत असताना संशोधन आणि लोक सहभागाची भूमिका महत्वाची आहे. जागतिक अन्न संघटनेच्या अभ्यासानुसार, जगभरातील विविध पिकांमधली जैवविविधता सुमारे ७५ टक्क्यांनी संपुष्टात आली आहे आहे. जगभरात आढळणाऱ्या सुमारे ३.९ लाख वनस्पती प्रजातींपैकी फक्त ३० प्रजाती आज जगाला मुख्यत्वेकरू अन्न पुरवतात. मात्र, आता वातावरण बदल आणि पोषण समृद्धीसाठी पारंपारिक बियाणे संवर्धन भविष्य काळाची पिके म्हणून संबोधले आहे. डॉ. एस. के. कौशिक यांनी कार्यक्रमाच्या आयोजनाची भूमिका स्पष्ट करून असे कार्यक्रम पूर्ण भारतभर घेत असल्याबाबत माहिती दिली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून अनुसूचित जाती मधील लोकांना एस.सी. एस.पी. कार्यक्रमांतर्गत विविध गोष्टींचा लाभ दिला जातो आणि या मिळालेल्या लाभांमधून त्यांनी स्वतःची प्रगती साधावी असे आवाहन केले.


कार्यक्रमाचे संचालन डॉ. सुकेशनी वाणे यांनी तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. सुनील गोमाशे यांनी केले. तसेच डॉ. जगदीश वाडकर, डॉ. नरेंद्र देशमुख, डॉ. प्रवीण देशपांडे, शिवाजी पिसे, नितीन काटे, कोकिळा भोपळे, रणजीत सदार, नयनसिंग चव्हाण, नंदकिशोर ढोरे, मंगेश देवकर यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### विधानसभा निवडणुकीतून निवृत्ती घेणार - भाजप आमदार बबनराव लोणीकर यांची घोषणा



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीतून निवृत्ती घेणार असल्याची घोषणा भाजपचे आमदार बबनराव लोणीकर यांनी म्हटले ..जालन्यातील आई साहेब लॉन्सच्या उद्घाटन सोहळ्यानिमित बबनराव लोणीकर हे बोलत होते,चाळीस वर्ष विधानसभा निवडणूक लढवली असून, आता विधानसभा निवडणूक लढण्याची ईच्छा नसून,पक्षाने जर संधी दिली तर शेवटची लोकसभा निवडणूक लढण्याची ईच्छा देखील लोणीकर यांनी व्यक्त केलिय..

### भारताची एकता, अखंडता किंवा सार्वभौमत्व धोक्यात आणणारे कृत्य केल्या प्रकरणी प्रशांत कोरटकर यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या प्रशांत कोरटकर यांनी महापुरुषांच्या व समाजाच्या भावना दुखवल्याने संतप्त झालेल्या सकळ मराठा समाज आणि मराठा क्रांती मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी आज कदीम जालना पोलिस ठाणे गाठत प्रशांत कोरटकर यांच्या विरुद्ध तक्रार दाखल केलीय.या तक्रारी वरून कदीम जालना पोलिसांनी प्रशांत कोरटकर यांच्या विरुद्ध महापुरुषां बद्दल अपशब्द वापरल्या प्रकरणी व मराठा समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या प्रकरणी आणि कलम १५२ मध्ये भारताची एकता, अखंडता किंवा सार्वभौमत्व धोक्यात आणणारे कृत्य केल्या प्रकरणी मराठा क्रांती मोर्चाचे समन्वय अशोक पडोळ यांच्या तक्रारी वरून गुन्हा दाखल केलाय. कोल्हापूर येथील इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना फोनवरून शिवीगाळ करत महापुरुषांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करणे प्रशांत कोरटकरला आता चांगलेच महागात पडले आहे. कोल्हापूर ,नागपुरात नंतर आता जालन्यात ही गुन्हा दाखल झालाय.या प्रकरणी कदीम जालना पोलिसानी सदरील गुन्हा अधिक तपासासाठी कोल्हापूर येथील राजवाडा पोलिस ठाण्यात वर्ग केलय. कोरटकर यांच्यावर कोल्हापुर आणि नागपूर या ठिकाणी गुन्हा दाखल झाल्या पासून कोरटकर फरार असून पोलिसांच्या दोन पथकाकडून त्यांचा शोध सुरू आहे.

### पशु पक्षांना पिण्यासाठी पाणी मिळावे यासाठी विद्यार्थ्यांचा स्तुत्य उपक्रम



दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** कोकणात दिवसेंदिवस उन्हाचा कडाका वाढत आहे. सर्वसामान्यांप्रमाणेच पक्षुपक्षांना देखील या उन्हाचा फटका बसत आहे. पशुपक्ष्यांच्या जीवनमानावर याचा गंभीर परिणाम दिसून येत आहे. पिण्याच्या पाण्यासाठी त्यांची ससेहोलपट होत आहे. डोळ्यांचे विकार, श्र्वसनाचे आजार पशुपक्ष्यांना होताना दिसून येत आहे. पाण्याच्या शोधात पक्षी भटकत असतात. सिमेंटच्या जंगलात झाडांची संख्या कमालीची कमी झाली आहे. पुरेशी सावलीही पशुपक्ष्यांना मिळत नाही. त्याचा सर्वाधिक त्रास पशू-पक्ष्यांना होत आहे. यासाठीच लांजा तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रीय शाळा कुवे क्रमांक- १ च्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली स्तुत्य उपक्रम राबवला आहे. पशु पक्षांना पिण्याच्या पाण्यासाठी टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू बनविल्या आहेत. नारळाची करवंटी, रिकामी बॉटल, बरण्या यांचा वापर केला गेला आहे. शाळेच्या परिसरामध्ये या वस्तू ठेवल्या गेल्या आहेत, जेणेकरून पशुपक्षीना पिण्याची पिण्याच्या पाण्याची सोय होईल, हा उपक्रम शाळेपूरती मर्यादित न राहता विद्यार्थ्यांनी आपल्या घरी देखील उस्फूर्तपणे राबविला आहे. या उपक्रमाची जनजागृती व्हावी अशी माहिती शिक्षकांनी दिली आहे.

# घटनेचा मास्टरमाईंड वाल्मीक कराडच

## आमदार सुरेश धस यांचा दावा



दैनिक आपला विदर्भ

**बारामती/प्रतिनिधी : वाल्मीक कराड मास्टर माईंड असून सुदर्शन घुले, प्रतीक घुले हे सगळे प्यादे आहेत. वापरून घेणारा तर वाल्मीक कराड आहे. वाल्मीक कराड हा शंभर टक्के यातला मास्टरमाइंड आहे. हे मी पहिल्या दिवसांपासून सांगत आहे. असा दावा आमदार सुरेश धस यांनी माध्यमांशी बोलताना केला.**

यावेळी आमदार सुरेश धस म्हणाले की, पोलिसांनी देखील आता वाल्मीक कराडचा सहभागावरती मोहर लावली आहे. तिन्ही गुन्हे वाल्मीकरांवर लावले गेले आहेत. कलम ३४ नुसार हे गुन्हे लावले गेले असल्याने वाल्मीक कराड हाच याचा मास्टरमाईंड असल्याचे सिद्ध झाले. वाल्मीक कराड हा सोपा, सीधा गुन्हेगार नाही. वाळू, राख यामध्ये देखील वाल्मीक कराडचे लोक आहेत. निवडणुकीत देखील लोकांनी परळीत येऊन फक्त शाई लावून जायचं मतदान यांनीच करायचं आजपर्यंत हेच घडले. या जगात फक्त पैसा सर्वश्रेष्ठ आहे, हे वाल्मिक कराड याने मानलं आहे. भारत देशातील जेवढ्या अमानुष घटना झाल्या आहेत.त्या सर्व घटना मागे सारले अशी घटना संतोष देशमुख यांच्या बद्दल घडली त्यांची क्रूरपणे हत्या करण्यात आली. कृष्णा आंधळे सापडेल कुठे जातोय तो पळतोय इकडे तिकडे संभाजीनगर ला जातोय कदाचित तो राज्याच्या बाहेर गेला असावा, कृष्णा आंधळे देखील सापडेल आणि सप्लिमेटरी चार्ज मध्ये देखील अनेक जन सापडतील.धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यायचा संपूर्णपणे अधिकार अजित पवार यांचा आहे. अजित पवार यांनी चेंडू धनंजय मुंडे यांच्या कोर्टात टाकलाय. अजित पवार म्हणाले की, माझ्यावर आरोप झाले त्यावेळेस मी राजीनामा दिला होताचा अर्थ धनंजय मुंडे यांनी समजून घेऊन राजीनामा द्यावा, अजित पवार यांच्या भोवती असलेले कोंडाळे अजित पवार यांना योग्य सल्ला देत नाही अयोग्य सल्ला देतोय. अजित पवार यांच्या पक्षाची हानी या प्रकरणामुळे संपूर्ण महाराष्ट्रात होत आहे. बीडकडे अशी लोकं मारल्यानंतर लक्ष द्यायचं नाही तर, लक्ष कुठे द्यायचं. हा प्रश्र्न आहे. लोकांच लक्षात तिकडे जाईल नाहीतर कुठे जाईल. बीडमध्ये सगळं अनबॅलन्स झाल आहे. आम्ही पहिल्यापासून सांगतोय की बिंदू नामावलीप्रमाणे बीडमध्ये अधिकाऱ्यांची नियुक्ती करा. दोन टक्के कर्मचाऱ्यांच्या जागा असताना सातशे टक्के झाल्यावर काय करायचं. आकाच्या लाभार्थ्यांनी बदलीची मागणी केली असेल ज्यांना कोणाला आमच्या जिल्ह्यात राहायचं नाही, त्यांनी लवकरात लवकर जिल्ह्याच्या बाहेर जावं.आमचा जिल्हा तुम्ही लुटाणूसारखा वापरला आमचा जिल्हा काय दुभती गाय काय.... तीन टाईम खेळायला कवा पळायची. पिळायची बंद झाली की जिल्ह्याच्या बाहेर जायचं.वाळू बंद झाली. राख बंद झाली. फक्त इकडून तिकडून लुटायचं कंपन्याकडून देखील भरपूर लुटले गेले आहे. एवढी भयानक घटना होऊन देखील पोलीस अधिकारी वाल्मीक कराडच्या कनेक्ट मध्ये होते. असे पोलीस आमच्या जिल्ह्यात नको त्यांनी जिल्ह्याच्या बाहेर लवकरात लवकर जावं. पवनचक्की खंडणीच शंकर टक्के मूळ आहे. खंडणी ट्रॉसिटी १०१ हे सर्व एक आहे.यामुळे काही चिंता करण्याची गरज नाही, आका आत गेले आहेत. सप्लीमेंट्री चार्जशीटमध्ये अजून अनेक लोकांची नावे येतील, मसाजोग देशमुख कुटुंबीय यांची ही मागणी आहे. ज्यांची नावे येतील त्यांना वेगळा मोका लागला पाहिजे. वेगळा मोका लागून हे आत गेले पाहिजेत. भविष्यात कोणीही चुकीच्या लोकांना मदत करता कामा नये. अशांसाठी स्वतंत्र मोका लावावा ही आमची मागणी आहे. राजकीय व्यक्तींचा आरोपींना पाठिंबा होतोय, अजूनही आरोपी म्हणतात हमारे पीछे ये है ओ है असं सांगत आहेत. त्यासाठीच आम्ही मुख्यमंत्री उपमुख्यमंत्र्यांकडे जाऊन बिंदू नामावलीचे मागणी करणार आहोत. बिंदू नामावली ची अंमलबजावणी लवकरात लवकर करा म्हणजे हे प्रश्र्न पुन्हा उद्भवणार नाहीत, असे मत यावेळी आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केली.



## विधानसभेचे सभापती राहुल नार्वेकर आज सांगलीत



**सांगली/प्रतिनिधी :** विधानसभेचे सभापती राहुल नार्वेकर आज सांगलीमध्ये विविध कार्यक्रमाच्या निमित्ताने दाखल झाले आहेत. सांगलीत येताच सभापती राहुल नार्वेकर यांनी स्वर्गीय वसंतदादा पाटील यांच्या समाधी स्थळावर जाऊन त्यांच्या समाधीचं दर्शन घेतलं. याचबरोबर श्रीमंत पहिले चिंतामणराव पटवर्धन यांच्या स्मारकास भेट देऊन स्मारकाचे दर्शन घेतलं. यानंतर श्री गणपती मंदिरामध्ये जाऊन श्री गणरायाचे दर्शन घेत सभापती नार्वेकर पुढील कार्यक्रमासाठी रवाना झाले. यावेळी त्यांच्यासमवेत खासदार विशाल पाटील, जनसुराज युवाशक्तीचे प्रदेशाध्यक्ष समिती कदम , भाजपा नगरसेविका उर्मिला बेलवलकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी दादांच्या समाधीस्थळी अभिवादन केल्यानंतर आज मी सांगलीत आलो आणि दादांच्या समाधीचे दर्शन घेतलं अशी प्रतिक्रिया विधानसभा सभापती राहुल नार्वेकर यांनी व्यक्त केली.

## संजय राऊत यांनी स्वतः च्या पक्षाचे वाटोळे केले

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची राऊत यांच्यावर टिका



दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** सल्लागार समितीची बैठक बोलावण्यात आली आहे, पाणी नियोजन कसे करावे, यासाठी बैठक घेतली आहे.राज्य सरकारने आपली भूमिका मांडली, सरकारची कमिटमेंट आहे. उंची वाढू द्यायची नाही. जी कायदेशीर कारवाई करायची ती करू, संजय राऊत यांनी स्वतःच्या पक्षाचा वाटोळ केले. आता त्यांना वेगळे लढण्याशिवाय पर्याय नाही, अशी टीका जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शिवसेना ठाकरे गट व संजय राऊत यांच्यावर केली.

यावेळी बोलताना राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, कामांना स्थगिती का दिली हा धोरणाचा एक भाग असू शकतो. राज्याच्या धोरणासंदर्भात निर्णय घेण्याचा अधिकार सर्वस्वी मुख्यमंत्री यांना आहे. शाडो कॅबिनेट संदर्भात त्यांचे नाटक सुरू आहे. काही दिवस त्यांना शाडोत राहावे लागेल, ते फार नवीन उभारी घेतील एस दिसत नाही. ३० वर्षापूर्वीची गोष्ठ त्या संदर्भात हा निकाल आहे. विरोधकाकडे कोणतेही काम शिल्लक राहिले नाही. स्वतः वाचविण्याचा प्रयत्न सुरू आहे. शक्तिपीठ झाले पाहिजे ही सर्वाची मागणी. सरकारने शक्तिपीठ विषय हा प्रतिष्ठेचा केलेला नाही.ज्या-ज्या ठिकाणी विरोध आहे, तिथले अलाइनमेंट बदलण्याचा प्रयत्न सुरू आहे. कालवा सल्लागार समिती बैठकीला मी स्वतः जातोय.इतकी चिंताजनक बाब किवा तितकी तीव्र नाही, पण जिल्हाधिकारी यांना भेटून याबाबत आढावा घेत आहे. पिण्या बरोबर शेतीला पाणी कस मिळेल हे आम्ही पहात आहोत. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीत प्रत्येकाने आचार संहिता पाळली पाहिजे, आपले मत आपल्या नेत्यांसमोर मांडावे, जाहीरपणे वक्तव्य करणे टाळावेत. संजय राऊत काय म्हणतात हे महत्वाचे नाही, संजय राऊत यांनी स्वतःच्या पक्षाचे वाटोळे केले आहे.. त्यांना वेगळ लढण्याशिवाय पर्याय नाही, त्याने गुन्हा केला नसेल तर तो फरार का झाला? त्याने गंभीर गुन्हा केलाय, त्यामुळे त्याच्यावर कारवाई होईल. असे मत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केले.

## पोलीस दल इतके सक्षम असताना तो आरोपी कसा काय सापडत नाही?

### इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांचा सवाल

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** पोलीस दल इतके सक्षम असताना आरोपी कसा काय सापडत नाही, हा गंभीर प्रश्र्न आहे. असे मत इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांनी माध्यमांशी बोलताना केला.

यावेळी ते पुढे म्हणाले की, तो धमकीचा फोन मोर्फिंग झाला असता तर त्यांच्याकडूनच झाला असता. स्वतः त्या व्यक्तीने नाव सांगितलं, म्हणून मी माझ्या पोस्टमध्ये त्या व्यक्तीचं नाव लिहिले आहे. प्रशांत कोरटकर यांनीच फोन केला होता. हे पोलिसांच्या तपासामुळे सिद्ध झाला आहे. मी कधीच कुणाला धमकीचा फोन केला नाही. त्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांना काय झाले तर, त्याला मी कसा काय जबाबदार. माझ्या पोस्टमध्ये सुद्धा मी त्यांचा नंबर दिला नाही किंवा कुणाला फोन करा म्हणून सांगितलं नाही. संबंधित व्यक्ती छत्रपती शिवरायांबद्दल, छत्रपती शंभूराजांबद्दल काय विचार करते, हेच सांगण्याचा माझा प्रयत्न होता. लोक त्यांना फोन करत असतील तर, त्याचा आणि माझा कुठलाही संबंध नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी परस्त्रीचा देखील सन्मान करा, अशी शिकवण दिली आहे.छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज आणि जिजाऊंबद्दल शिंतोडे उडवण्याचा प्रयत्न त्या व्यक्तीने केला आहे. कोरटकरांच्या घरातील लोकांनी देखील सांगितलं पाहिजे होते की, ते चुकीचे बोलले आहेत.



हे प्रकरण वेगळीकडे नेण्याची भूमिका जर कुणाचे असेल तर ते देखील बरोबर नाही. पोलीस दल इतकं सक्षम असताना तो आरोपी कसा काय सापडत नाही? काल साधारण सहा ते सात तास फॉरेन्सिक टीमने माझ्या मोबाईल मधील जे आवश्यक पुरावे पाहिजे आहेत ते घेतले आहेत. मला कारवाईबाबत कुठल्याही अपडेट पोलिसांकडून मिळत नाहीत, माध्यमांमधून जे अपडेट मिळतात. तितकंच मला माहिती आहे. पोलिसांनी मला सुरक्षा घेण्याबाबत सांगितलं होते.मात्र, मी ते नाकारले आहे. अशी माहिती इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांनी दिली.

## वरणगाव येथे टायर दुकानाला भीषण आग लाखो रुपयांचे नुकसान

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** भुसावळ तालुक्यातील वरणगाव येथील मुक्ताईनगर रोडवर जूना लोककल्यान हॉस्पीटल च्या कंपाउडला दुकाने आहेत . या दुकानाती टायबा टायर्स या मुस्लीम भाई टायर दुकानाला अचानक भीषण आग लागल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे

मुस्लीम भाई टायर दुकानाला अचानक आग लागल्याने दुकानातील नवीन टायर व जूने टायर तसेच दुकाना समोर लावलेली स्कूटी व मोटर सायकल जळून खाक झाली आहे . सुदैवाने मोटरसायकलच्या पेट्रोलच्या टाकीचा स्फोट झाला नसल्याने मोठे हानी टळली आहे .आजूबाजूला असलेली दुकाने चायनीज निजाम शेख, रेडीटर शॉप इसमाइल



शहा, विश्वकर्मा मोटर गॅरेज हेमत लोहार, मजहर ऑटो मॅरेज आणि इलेक्ट्रीक गॅस वेल्डीग या तीघांच्या दुकानाला ही आग लागल्याने यांच्या दुकानातील साहीत्य जळून खाक झाले आहे.आग वाढत गेल्याने बंद असलेले लोककल्याण हॉस्पीटल च्या आवारात जूने बंद असलेले मेडीकल साहित्य जळून खाक झाले आहे.

सदरची आग विझविण्याचे महत्वाचे कार्य वरणगाव फॅक्टरी च्या अग्निशमन बंब व्दारे करण्यात आले आहे . वरणगाव नगरपालिका जीप नगर प्रशासन वरणगाव फॅक्टरी हे या ठिकाणी उपस्थित झाले होते यावेळी बंब भरण्यासाठी निलेश झोपे यांची सुद्धा मदत झाली.सदरची भीषण आग कोणत्या कारणामुळे लागले हे अद्याप स्पष्ट झाले नाही, परंतु ही या शॉक सर्किट मुळे लागली असावी असा अंदाज व्यक्त होत आहे सदर आगीत दहा ते पंधरा लाखापर्यंतचे नुकसान झाले असल्याचे अंदाज व्यक्त करण्यात येत आहेघटनास्थळाचे त्वरित पंचनामे करून नुकसान भरपाई मिळावी अशी मागणीसुद्धाहोतआहे.

# विकास कामाच्या भूमिपूजनावरून आरोप प्रत्यारोपाच्या फैरी

## माजी आमदार म्हणतात काम आम्ही आणले; सोशल मीडियावर चर्चेला उधाण

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी : मतदारसंघातील मोप ते शेंदूर्जन रस्त्याचे भूमिपूजन नुकतेच आमदार सिद्धार्थ खरात यांच्या हस्ते करण्यात आले आहे. मात्र, याबाबत सोशल मीडियावर आरोप प्रत्यारोपाच्या फैरी झाडल्या जात असून सोशल मीडियावर उद्घाटन कामाच्या संदर्भात चर्चेला उधाण आले आहे.**

काही महिन्यांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत तब्बल तीन वेळा आमदार राहिलेले डॉ.संजय रायमुलकर यांचा पराभव झाला आहे.तर, पहिल्याच एन्ट्री आमदार सिद्धार्थ खरात यांनी विकासाचे व्हिजन समोर ठेवून अल्पावधीतच लोकप्रियता मिळवत विजय संपादन केला आहे. मतदारसंघात आता विकास कामाची गंगा वाहेल असे मत व्यक्त करत त्यांनी विकास कामाच्या भूमिपूजनाला प्रारंभ केला आहे. मात्र, आमदार सिद्धार्थ खरात यांनी केलेल्या विकास कामाच्या भूमीपूजन संदर्भात आरोप प्रत्यारोपाच्या फैरी सोशल मीडियावर झाडल्या जात आहेत.

माजी आमदाराचे समर्थक हे भूमिपूजन करण्यात आलेले काम खासदार प्रतापराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली माजी आमदार संजय रायमुलकर यांनी मंजूर केले असल्याचे सांगीत आहेत. तर, विद्यमान आमदार सिद्धार्थ खरात मतदार संघात विकास कामाला निधी कमी पडू देणार नाही, असे सांगून मतदार संघातील रस्ता कामाचे भूमिपूजन करण्याचा सपाटा लावला आहे. या सदर्भात मात्र, माजी आमदार व आमदार यांच्या समर्थकांमध्ये सोशल मीडियावर आरोप प्रत्यारोपाच्या फैरी झाडल्या जात आहेत. यामध्ये मात्र काय तथ्य आणि कितीपत सत्य हे अद्यापही गुलदस्त्यात आहे.






**सोशल मीडियावर मेसेज व्हायरल होत असून याबाबत आरोपही केले जात आहेत मात्र यामध्ये सत्य काय हे अद्याप गुलदस्त्यात असून यापूर्वी असा एक प्रकार समोर आला होता. त्यामध्ये आमदार सिद्धार्थ खरात यांनी कामाचे भूमिपूजन केले होते मात्र काही दिवस उलटल्यानंतर माजी आमदार यांनी त्याच कामाचे भूमिपूजन करण्यात आल्याचे समोर आले होते. आता मात्र पुन्हा एकदा असाच काहीसा प्रकार सोशल मीडियावर होत असलेल्या व्हायरल एसएमएस मध्ये दिसून येत आहे.**

## विविध वृत्त...

### अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यात शेतकऱ्याने केली सफरचंदाची शेती





दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** अकोल्यातल्या अकोट तालुक्यातल्या ऐदलापूर गावातल्या नवनीत चांडक या शेतकऱ्याचा हा धाडसी प्रयोग. चांडक यांनी एका एकरात ७०० सफरचंदाची झाडे लावली आहे. हिमाचल प्रदेश अथवा जम्मू काश्मीर सारख्या थंड हवामानात घेतले जाणारे सफरचंद पीक आता अकोल्यासारख्या उष्ण शहरात घेतले जाते. तर अकोट तालुक्यातल्या ऐदलापूर इथल्या तीन शेतकऱ्यांनी सफरचंद लागवड केली आहे. येत्या दिड महिन्यात सफरचंदाचे पीक हाती त्यांच्या येणार आहे. प्रत्येकी झाडाला २० ते २५ सफरचंद फळ लागले आहे. हे दोन वर्षाचे सफरचंदाची झाडे असून, तब्बल पाच फूट एवढी या झाडाची वाढ झाली आहे. त्यामुळे प्रत्येक झाडाला १० ते १२ किलो इतके सफरचंद मिळणार असल्याचे नवनीत चांडक यांनी सांगितले.

### चाळीसगाव रोड पोलिसांची धडक कारवाई; अवघ्या काही तासातच लावला चोरीचा छडा



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** धुळे शहरातील चाळीसगाव रोड पोलीस स्टेशनच्या डी.बी. पथकाने धडक कामगिरी करीत एका चोरट्याला अवघ्या काही तासांतच अटक केली असून त्याच्याकडून ४६ हजार ५०० रुपयांची रोख रक्कम तसेच ५ हजार रूपयांचा मोबाईल व पाकीट जप्त करण्यात आले आहे. या संदर्भात चाळीसगाव रोड पोलीस स्टेशनचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन बोरसे यांनी सांगितले की, एका चोरट्याने विकास बन्सीलाल पाटील यांच्या गौरव रोडवेज ट्रान्सपोर्ट ऑफिस पाठीमागील लाकडी दरवाजा तोडून ५० हजार रुपये रोख रक्कम तसेच मोटोरोला कंपनीचा मोबाईल त्याचबरोबर एक पाकीट चोरून नेले होते. या पाकिटात आधार कार्ड होते, असा एकूण ५५ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेण्यात आला होता. याबाबत चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत अवघ्या काही तासातच ह्या चोरट्याला पोलिसांनी ताब्यात घेत त्याला पोलिसी खाक्या दाखवतात त्याने चोरी केल्याची कबुली दिली असल्याची माहिती पोलीस निरीक्षक जीवन बोरसे यांनी यावेळी दिले.

### अवैधरित्या गोवंश वाहतूक करणाऱ्या दोन गाड्यांसह १९ गोवंश व २८ लाखाचा मुद्देमाल पोलिसांकडून जप्त

**जळगाव/प्रतिनिधी :** शिरपूर कडून चोपडाकडे येणाऱ्या रस्त्याने दोन बोलेरो पिकअप गाड्यांमध्ये गोवंश दाटी वाटीने शरीराला इजा होईल अशा अवस्थेत कत्तलीसाठी वाहतूक केली जात असल्याच्या गोपनीय माहिती वरून शहर पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांनी अकुलखेड्याजवळ सापळा रचला. त्यामध्ये वाहतूक करणाऱ्या वाहनधारकांनी रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करत जोरात वाहन पळवून शेतात बाजूला पिकअप गाडी सोडून पळ काढला. त्या दोन पिकप बोलेरो गाडीमध्ये १९ गोवंश शरीराला इजा होईल अशा अवस्थेत मिळून आले. १९ गोवंश व दोन पिकअप बोलेरो गाडी असा २८ लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याविषयी चोपडा शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला असून गोवंशला गोशाळेत रवाना करण्यात आले असल्याचे पोलीस उपविभागीय अधिकारी अण्णासाहेब घोलप यांनी सांगितले.

## स्व. पुंडलिकराव गवळी महाविद्यालयात रासेयो शिबिराचे उदघाटन

### विधानपरिषद आ.भावनाताई गवळी याची विशेष उपस्थिती



**शिरपूर जैन/प्रतिनिधी :** राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) ही एक उच्च शिक्षण प्रणालीतील योजना आहे. या योजनेचे मुख्य उद्दिष्ट विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करून त्यांना सामाजिक कार्याचा सराव करण्यास वाव देणे हे आहे. हेच लक्षात घेता दि.०१ शनीवार रोजी राष्ट्रीय सेवा योजना - विशेष श्रमसंस्कार शिबीराचे उदघाटन विधान परिषद आमदार तथा अध्यक्ष महिला उत्कर्ष प्रतिष्ठान मा.भावनाताई गवळी पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.डब्ल्यू खाडे सर यांनी भूषविले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.श्रीकांत कलाने यांनी केले तर प्रास्ताविक प्रा.रवी खडसे सर यानी पार पाडले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.शिवाजी एम. शेंडे यांनी केले व सर्व उपस्थित पदाधिकारी तसेच शिबिरार्थींचे आभार मानले.

## गोंधळ घालणे, दादागिरी करणे हाच कार्यक्रम या शेतकरी संघटनेचा चालू आहे

### प्रतापराव जाधव यांची रविकांत तुपकरांवर टीका



दैनिक आपला विदर्भ


**बुलडाणा/प्रतिनिधी :** शेतकऱ्याच्या नावावर स्वतःची तुंबडी भरायची आणि दादागिरी करून स्वहीत जपायचे. दादागिरी करणे हाच कार्यक्रम शेतकरी संघटनेचा कार्यक्रम आहे. अशी टीका केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांना शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्यावर माध्यमांशी बोलताना केली.

प्रतापराव जाधव म्हणाले की, उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस सोबत जाऊन किती खोके घेतले, विधानसभेत मतदारांनी शिक्कामोर्तब केलेला आहे. एकनाथ शिंदे यांनी घेतलेला निर्णय हाच बरोबर होता. बाळासाहेब यांचे विचार आणि खरे हिंदुत्व हे एकनाथ शिंदे पुढे घेऊन जात आहेत.गद्दारीचा ठपका आता त्यांच्यावर लागलेला आहे. त्यांनीच भाजपा सोबत जाऊन काँग्रेस राष्ट्रवादी सोबत जाऊन घरोबा केला आहे. हीच खरी गद्दारी होती. यावर जनतेने शिक्कामोर्तब केला आहे.रविकांत तुपकर यांनी यापूर्वी किती आंदोलने जाहीर केली. मात्र, कधीही अरबी समुद्रात उडी घेतली नाही.कधीही मंत्रालयाचा ताबा घेतला नाही. नुसता गोंधळ घालणे, दादागिरी करणे, धांगडधिंगा करणे, हाच कार्यक्रम या शेतकरी संघटनेचा चालू आहे. महाराष्ट्रात सगळ्यात जास्त सोयाबीन खरेदी आपल्या जिल्ह्यात झाली.कोणत्याही शेतकऱ्यांच्या तक्रारी राहिल्या नाहीत.वास्तविक केंद्र सरकार कडून शेतकऱ्यांची २५ टक्के सोयाबीन खरेदी करण्याची जबाबदारी आहे. मात्र याठिकाणी ७० टक्केपेक्षा जास्त सोयाबीन खरेदी झाली आहे.अशी माहिती केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली.

## या सरकारमुळे विकासकामांची गती मंदावली : हर्षवर्धन सपकाळ यांचा आरोप

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** सरकारमध्ये प्रचंड प्रमाणात अनागोंदी सुरू आहे. या सरकारमुळे महाराष्ट्राच्या विकास कामाची गती मंदावली आहे. त्यामुळे महाराष्ट्र एचडी वर जात आहे असा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी माध्यमांशी बोलताना केला. ते म्हणाले की, आरोग्य विभाग विकास कामांना स्थगिती, दिली आहे.महाराष्ट्र सरकार महसुली तुटीत असल्याने याची किंमत नागरिकांना चुकवावी लागत आहे. विकास कामांचा वेग मंदावला आहे. सगळ्यांना समान हक्क कायदा अधिकार आहे. आता सरकार तुटीचा अर्थ संकल्प सादर करण्याच्या तयारीत आहे. सरकारी तिजोरीतील पैसे हा वेगवेगळे योजना वळती करण्यात आलेला आहे. तिजोरीत खाली आहे. त्यामुळे सरकार शाळा बंद करत आहे. दुसरीकडे आरोग्य विभागाच्या योजनांना कात्री लावली आहे म्हणून शिक्षण आणि आरोग्य विभागाचा पैसे कपात केला हा निर्णय निंदनीय आहे. हे सरकार संविधान नुसार काम करत



नसून नागरिकांचे मूलभूत अधिकारांचे संरक्षण करत नाही, ही अत्यंत शरमेची बाब आहे. हे भाजपाचे सरकार असून, मित्रपक्षांचे ही आहे. हे तिन्ही इंजिन आता महाराष्ट्राचे मूलभूत अधिकार खायला निघाले आहेत. मोदींकडे जर यांची चलती आहे. तर, या तिघांनी दिल्लीत जाऊन बसावे आणि महसुली तूट भरून काढण्यासाठी स्वतःची पत आणि असेलच तर वजन वापरावे. शिक्षण आरोग्य विभागातील निधीची कपात करू नये. अन्यथा काँग्रेस पक्ष आंदोलन केल्याशिवाय स्वस्त बसणार नाही.आता तरी धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा, सरकारने अन्यथा त्यांना बरखास्त करावे. ठाकरे गटाकडून विरोधी पक्षनेता पदावर दावा केला आहे. आम्ही आघाडीच्या माध्यमांतून निवडणूक लढल्या आहेत. विधिमंडळातील आमचे सहकारी मित्रपक्षाशी चर्चा करून योग्य तो निर्णय घेतील. पीएफ वरील व्याज कपात केले आहे. बँकेतील ज्या ठेवी आहेत. त्या सगळ्या ठेवी उद्योगपतींनी वेठीस धरल्या आहेत. सगळे उद्योगपती त्यातून वारेमाप पैसे मिळवत आहेत. याचा फटका कामगारांना बसत आहे. हे सरकार हम दो हमारे दो चे सरकार आहे. वाहनाचे नंबर प्लेट शुल्क महाराष्ट्रात तिप्पट आकारले जाते. वास्तविक गोवामध्ये १५५ असेल, गुजरात मध्ये १६० असेल तर महाराष्ट्रात १०० रुपयात द्यावे. आम्ही त्यांच्या प्रकरणाचा पर्दाफाश केल्यावर, जर सरकारला शरम नसेल तर अत्यंत दुर्दैवी बाब आहे. याचा थेट फटका नागरिकांच्या खिशाला पडत आहे. यासंदर्भात आम्ही विधानसभेत आवाज उठवल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा काँग्रजचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी माध्यमांशी बोलताना दिला.

# दरोडेखोरांन अटक करून मुद्देमाल परत करा

## माजी राज्यमंत्री सुबोध सावजी यांचे ठाणेदारांना निवेदन अन्यथा बैठ्या सत्याग्रह आंदोलनाचा इशारा

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** शहरातील शिवाजीनगर येथील नंदकिशोर राहाटे यांच्या घरी वाढदिवसा दुपारी हायअलर्ट अति सुरक्षेचा गराडा असलेल्या वस्तीत दरोडा टाकून ३२ तोळे सोडणे चांदीच्या वस्तू असा लाखो रुपयाचा ऐवज लंपास केला आहे. सदर प्रकरणाची गांभीर्याने चौकशी करून दरोडेखोरांना तात्काळ अटक करावे व मुद्देमाल रहाटे यांना परत करावा, अशी मागणी माजी मंत्री सुबोध सावजी यांनी मेहकर पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांना निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद केले आहे की, १८ फेब्रुवारी रोजी मेहकर येथील शिवाजी नगर मधील नंदकिशोर रहाटे यांच्या घरी भरदिवसा दुपारी अतिसुरक्षेचा गराडा असलेल्या वस्तीत ३२ तोळे सोने काही चांदीच्या वस्तु व इतर वस्तु चोरून दरोडा घातला आहे.या बाबत ऋषी नंदकिशोर रहाटे यांनी तक्रार नोंदविली आहे. रहाटे यांच्या घरी पडलेल्या दरोड्याची त्वरीत चौकशी करून गुन्हेगारास पकडावे व मुद्देमाल घरमालक रहाटे यांना त्वरीत परत करावा, सदर प्रकरणाबाबत चुकीच्या पध्दतीने वरिष्ठांची दिशाभूल करणारी माहिती नोंदवून घेतली आहे. चोरी गेलेल्या सोने, चांदी व इतर वस्तुची किंमत आपण खरी नोंदविली नाही, आपण घरमालकास सोगीतले त्या वस्तु आपण विकत घेतल्या त्या वेळेसची किंमत आम्ही नोंदविणार, कारण आजच्या बाजार भावामध्ये ही किंमत नोंदविल्यास हा दरोडा ३० लाख रुपये किंमतीचा होतो. व ही किंमत आम्ही नोंदविल्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून आमच्यावर ठपका ठेवला जातो. किंवा आमच्या बदल्या होवू शकतात, असे आपण कैफीयत नोंदवून घेताना सीगीतले. व त्या कारणाने दरोड्यात चोरी गेलेल्या वस्तुची किंमत फक्त १३ लाख काही हजार रुपये दाखविली. आपण नोंदविलेली तक्रार दुरुस्त करून घ्यावी दरोड्याचा तपास लवकरात लवकर लावावा.

या दरोड्याचा तपास १५ मार्च पर्यंत लावून दरोडेखोरांना अटक करावी व मुद्देमाल घरमालकास परत करावा. अन्यथा १६ मार्च पासून मेहकर पोलीस स्टेशन कार्यालयात समोर बैठा सत्याग्रह आंदोलन करण्यात येईल, असा इशारा माजी मंत्री सुबोध सावजी यांनी दिला आहे.



निवेदनाच्या प्रतिलिपी बुलढाणा पालकमंत्री मकरंद पाटील, केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, अमरावती विभागीय पोलीस आयुक्त, आमदार सिद्धार्थ खरात, पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांना दिलेल्या आहेत